# 'एमआयटी'त डॉ. कराड यांचे योगदान कौतुकास्पद

पुणे : प्रतिनिधी

शिक्षणक्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या एमआयटीची उभारणी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी दूरदृष्टी ठेवून केली. परंतु, एमआयटीच्या यशस्वी वाटचालीत डॉ. मंगेश कराड यांनी हिरिरीने सहभाग घेत प्रा. कराडांना मोलाची साथ दिली. एमआयटीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवण्यात मंगेश कराड यांनी दिलेले योगदान कौतुकास्पद आहे, अशा शब्दांत ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी डॉ. मंगेश कराड यांच्या कार्याचा गौरव केला.



प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. विजय भटकर यांनी भेट दिली.

माईर्स एमआयटी शिक्षणसंस्था समूहाचे सचिव व कार्यकारी संचालक प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या सुवर्णमहोत्सवी (५० वा) वाढदिवसानिमित्त मित्रपरिवार व सहकारी कर्मचारीवृंदातर्फे अभीष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन केले होते. या सोहळ्याला विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, सिंहगड इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. मारुती नवले, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष विश्वजीत कदम, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, बंगळुरुतील रामय्या विद्यापीठाचे कुलपती डॉ. एम. आर. जयराम, माजी उपमहापौर दीपक मानकर, काँग्रेसचे नेते अभय छाजेड यांच्यासह शिक्षण, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, मित्रपरिवार, कराड कुटुंबीय आणि एमआयटीचे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. विजय भटकर म्हणाले, आजच्या स्पर्धात्मक, धकाधकीतही डॉ. मंगेश यांनी शाश्वत मूल्ये जपली आहेत. एमआयटीच्या संघर्षाच्या प्रसंगात त्यांनी लढवय्या नेत्याची भूमिका बजावली आहे. प्रेम, आपुलकी, आस्था आणि सहकार्याच्या भूमिकेतून त्यांचे सर्वांशी वागणे अनेकांना जोडत गेले आहे.

सत्काराला उत्तर देताना डॉ. मंगेश कराड म्हणाले, ''आयुष्यात माझ्या हातून जे काही कार्य घडले त्यामागे थोरामोठ्यांचे आशीर्वाद आणि काका प्रा. विश्वनाथ कराड यांची प्रेरणा आहे. काकांचा प्रवास अगदी जवळून पाहिलेला असल्याने काकांसह शरद पवार, शंतनुराव किर्लोस्कर, डॉ. विजय भटकर यांच्यासारख्या थोर व्यक्तींकडून खूप काही शिकलो.''

निनाद पाटील यांनी प्रास्ताविक तर प्रा. अतुल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.